जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 JUL 2026 पुण्यनगरी

## कुलगुरू डॉ. कामत यांच्या भेटीने भारावले ९२ वर्षीय साहित्यिक चंद्रकुमार नलगे

# शब्दांच्या ऋषींसमोर कुलगुरू कृतज्ञ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

काही भेटी या केवळ औपचारिक नसतात... त्या माणुसकीचा हात हातात देणाऱ्या, कर्तृत्वाला मनापासून केलेल्या सलामाच्या असतात. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी शनिवारी ९२ वर्षीय ज्येष्ठ साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व प्रा. चंद्रकुमार नलगे यांच्या कोतोली फाटा (पन्हाळा रोड) येथील निवासस्थानी जाऊन घेतलेली सदिच्छा भेट अशीच आयुष्यभर स्मरणात राहणारी ठरली.



१०१ पुस्तकांचे लेखन, त्या साहित्यावर सहा चित्रपट, पंधराहून अधिक मानाचे पुरस्कार, हजारो विद्यार्थ्यांचे जीवन घडविणारे शिक्षक आणि अनेक संस्थांचे संस्थापक अशी भव्य कारकीर्द लाभलेल्या प्रा. नलगे यांच्याशी कुलगुरू डॉ. कामत यांनी सुमारे अर्धा तास विविध विषयांवर मनमोकळा संवाद साधला. त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करताना त्यांच्या साहित्य, शिक्षण आणि सामाजिक कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

या भेटीत जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. शिवाजी विद्यापीठातील 'कमवा व शिका' योजनेत केलेल्या कामाच्या आठवणी सांगताना प्रा. नलगे भावूक झाले. आयुष्यभर केलेल्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्याची दखल घेत आपण आवर्जून भेटायला आलात, याचा आयुष्यातील सर्वोच्च आनंद झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. तुमच्या भेटीमुळे मला नवी ऊर्जा मिळाली, असे सांगताना त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटून आले.

यावेळी कुलगुरू डॉ. कामत यांनीही अत्यंत नम्र शब्दांत प्रा. नलगे यांच्याप्रती आदर व्यक्त केला. ऊर्जा आम्ही देत नाही, समाजाला ऊर्जा देणारे तुम्ही आहात. तुमची भेट ही माझ्यासाठी प्रेरणादायी आहे, असे सांगत महाराष्ट्राच्या सामाजिक आणि शैक्षणिक पायाभरणीत प्रा. नलगे यांचे योगदान भरीव असल्याचे त्यांनी गौरवोद्गार काढले. यावेळी प्रदीप नलगे, अनिता नलगे आणि शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर उपस्थित होते.

19 JUL 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरू भेटण्यासाठी आले अन् चंद्रकुमार नलगे भारावले

## कोतोली रोडवरील निवासस्थानी ज्येष्ठ साहित्यकाशी चर्चा : निवडक पुस्तके कुलगुरूंना भेट

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी शनिवारी ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकुमार नलगे यांची सदिच्छा भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली. कुलगुरूंच्या या अचानक भेटीमुळे ९२ वर्षांचा हे ज्येष्ठ साहित्यिक भारावून गेले.

विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून आपण इतक्या आस्थेने विचारपूस करण्यासाठी आलात, असे म्हणत असताना त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटून आले. त्यांनी आपली काही निवडक पुस्तके कुलगुरूंना भेट दिली. कुलगुरु डॉ. रजनीश कामत यांनी नलगे यांची त्यांच्या कोतोली रोडवरील निवासस्थानी जाऊन त्यांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस केली. या भेटीदरम्यान डॉ. कामत आणि नलगे यांच्यात मनमोकळा संवाद झाला. कुलगुरू डॉ. कामत यांनी नलगे यांच्या साहित्यिक योगदानाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक योगदानाबद्दल कृतज्ञतापूर्ण भावना व्यक्त केल्या.



**शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या सदिच्छा भेटीप्रसंगी जुन्या आठवणींत रमलेले ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकुमार नलगे.**

### जुन्या आठवणी ताज्या...

शिवाजी विद्यापीठाच्या 'कमवा आणि शिका' या योजनेसाठी दिलेल्या योगदानाबद्दल तसेच अन्य जुन्या आठवणींविषयी बोलताना चंद्रकुमार नलगे यांना गहिवरुन आले. यावेळी प्रदीप नलगे, अनिता नलगे आणि विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते.

19 JUL 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरूंच्या भेटीने ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकुमार नलगे भारावले

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी आज ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकुमार नलगे यांची सदिच्छा भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली. कुलगुरूंच्या या अचानक भेटीमुळे ९२ वर्षांचा हा साहित्यिक भारावून गेला.

कुलगुरु डॉ. रजनीश कामत यांनी नलगे यांची त्यांच्या कोतोली रोडवरील निवासस्थानी जाऊन त्यांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस केली. या भेटीदरम्यान डॉ. कामत आणि नलगे यांच्यात मनमोकळा संवाद झाला. कुलगुरू डॉ. कामत यांनी नलगे यांच्या साहित्यिक योगदानाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक योगदानाबद्दल कृतज्ञतापूर्ण भावना व्यक्त केल्या. शिवाजी विद्यापीठाच्या 'कमवा आणि शिका' या योजनेसाठी दिलेल्या योगदानाबद्दल तसेच अन्य जुन्या आठवणींविषयी बोलताना चंद्रकुमार नलगे यांना गहिवरुन आले. विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून आपण इतक्या आस्थेने विचारपूस करण्यासाठी आलात, असे म्हणत असताना त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटून आले. त्यांनी आपली काही निवडक पुस्तके कुलगुरूंना भेट दिली. यावेळी प्रदीप नलगे, अनिता नलगे आणि विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 JUL 2026

जनप्रवास

# विद्यापीठासाठी लवकरच एआय प्रणाली

## कुलगुरु डॉ. राजनीश कामत यांची घोषणा : कार्यपद्धतीला कार्यक्षमतेची दिशा मिळणार

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या प्रशासकीय कामकाजासाठी स्वतंत्र आणि सुरक्षित अशी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित प्रणाली लवकरच विकसित करण्याची महत्त्वपूर्ण घोषणा कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केली. प्रशासन, अध्यापन, संशोधन, नवोपक्रम आणि विद्यार्थी-सुविधा या पाच प्रमुख क्षेत्रांमध्ये ही प्रणाली उपयुक्त ठरणार असून, विद्यापीठाच्या कार्यपद्धतीला अधिक वेग, अचूकता आणि कार्यक्षमतेची दिशा मिळणार आहे.

स्वतःच्या सुरक्षित सर्व्हरवर चालणारी ही प्रणाली विद्यापीठाच्या डिजिटल परिवर्तनातील एक निर्णायक पाऊल ठरेल. जिथे गती, अचूकता आणि गोपनीयता एकाच वेळी साध्य होईल, असे डॉ. कामत यांनी यावेळी नमूद केले.

शिवाजी विद्यापीठात शनिवारी विद्यापीठातील सर्व अधिकारी, अधिष्ठाता, संचालक, कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्यासाठी एआयच्या वापराबाबत विशेष कार्यशाळा झाली. त्यावेळी कुलगुरू डॉ. कामत बोलत होते. कार्यशाळेत टाटा कम्युनिकेशन्स लि. कंपनीचे वरिष्ठ एआय अधिकारी बळवंत गोरड यांनी मार्गदर्शन केले. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे,



परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव आणि वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, विद्यापीठातील बैठका, अधिकृत टिपण्या, नियमावली, अधिनियम, अध्यादेश, तसेच विविध प्रशासकीय नोंदींचे विश्लेषण करण्यासाठी सध्या मोठ्या प्रमाणावर वेळ खर्च होतो. ही प्रक्रिया सुलभ करण्यासाठी एआयचा वापर केल्यास संबंधित कागदपत्रांचे पिन-पॉईंट विश्लेषण, संदर्भाधारित नोंदी, नियमांची पडताळणी आणि आवश्यक ते संदर्भ स्वयंचलितपणे उपलब्ध होऊ शकतील. ही प्रणाली पूर्णपणे शिवाजी विद्यापीठाच्या सर्व्हरवर कार्यरत राहणार असल्याने डेटा सुरक्षा, गोपनीयता आणि संस्थात्मक माहितीचे संरक्षण यांना प्राधान्य दिले जाणार आहे. सार्वजनिक एआय साधनांच्या तुलनेत ही व्यवस्था विद्यापीठाच्या गरजांनुसार सानुकूलित असेल. विशेषतः विद्यापीठाचे अंतर्गत नियम, अधिनियम आणि इतर अप्रकाशित माहितीही या प्रणालीमध्ये समाविष्ट करता येणार आहे.

डॉ. कामत यांनी सांगितले की, या एआय प्रणालीचा उपयोग केवळ प्रशासनापुरता मर्यादित न राहता अध्यापन-अध्ययन प्रक्रियेतही होईल. विद्यार्थ्यांना त्यांचे अभ्यासक्रम, संदर्भग्रंथ, प्रकल्प सूचना आणि संशोधन साधने यांचा योग्य वेळी लाभ मिळू शकेल. याशिवाय फ्लिप्ड क्लासरूम, ओपन एज्युकेशन मॉडेल, लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम आणि संशोधनासाठीची स्वतंत्र डिजिटल लायब्ररी या संकल्पनांनाही यामुळे बळ मिळणार आहे. या उपक्रमामुळे कामाचा ताण कमी होऊन निर्णय प्रक्रिया जलद होईल, उत्पादकता वाढेल आणि प्रशासन अधिक पारदर्शक व परिणामकारक होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शिवाजी विद्यापीठाचे तांत्रिक पथक, आयटी सेल आणि संबंधित तज्ज्ञांच्या सहकार्याने विकसित होणारी ही प्रणाली विद्यापीठाच्या डिजिटल परिवर्तनातील महत्त्वाचे पाऊल ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**शैक्षणिक संस्थांसाठी एआय अत्यंत उपयुक्त : बळवंत गोरड**

कार्यशाळेत बळवंत गोरड यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) उपयुक्ततेवर प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांनी आजच्या जगातील भारताची आर्थिक व तांत्रिक स्थिती स्पष्ट करताना शिक्षण आणि तंत्रज्ञानाच्या योग्य वापरातून देशाचा विकास कसा वेगाने होऊ शकतो, हे सविस्तर मांडले. विशेषतः शैक्षणिक संस्थांसाठी एआय प्रणाली अत्यंत उपयुक्त असून विद्यापीठांतील प्रशासकीय कामकाज, कागदपत्र प्रक्रिया, नियामक अनुपालन, संशोधन, परीक्षा, वित्त, मानव संसाधन आणि विद्यार्थीसेवा यासारख्या विविध विभागांमध्ये तो प्रभावी ठरू शकतो. चॅटजीपीटीसारखी साधने ही एआयची केवळ उदाहरणे असून, संस्थेच्या स्वतःच्या डेटासह स्थानिक सर्व्हरवर एलएलएम आधारित प्रणाली उभारल्यास गोपनीयता जपली जाऊ शकते, असे स्पष्ट केले. सर्क्युलरचे सारांश, महत्त्वाचे मुद्दे, कृतीसूची तयार करणे, मीटिंगचे इतिवृत्त, पत्रलेखन, बजेट विश्लेषण, टेंडर ड्राफ्टिंग, नॅक, एनआयआरएफ इत्यादींसाठी एसएसआर निर्मिती व दस्तऐवजीकरण यासारखी कामे अल्पावधीत कशी करता येतील, हे त्यांनी प्रात्यक्षिकांद्वारे दाखवून दिले.

यावेळी ॲकॅडमी ऑफ ॲकॅडेमिक ॲडमिनिस्ट्रेशनचे समन्वयक डॉ. केदार मारुलकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सुहासिनी पाटील यांनी आभार मानले.

# शिवाजी विद्यापीठासाठी लवकरच स्वतंत्र एआय

## कुलगुरू डॉ. कामत : प्रशासन, अध्यापन आणि संशोधनाला लाभणार आधुनिकतेचे बळ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या प्रशासकीय कामकाजासाठी स्वतंत्र आणि सुरक्षित अशी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित प्रणाली लवकरच विकसित करण्याची महत्त्वपूर्ण घोषणा कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केली. प्रशासन, अध्यापन, संशोधन, नवोपक्रम आणि विद्यार्थी सुविधा या पाच प्रमुख क्षेत्रांमध्ये ही प्रणाली उपयुक्त ठरणार असून, विद्यापीठाच्या कार्यपद्धतीला अधिक वेग, अचूकता आणि कार्यक्षमतेची दिशा मिळणार आहे.

विद्यापीठातील सर्व अधिकारी, अधिष्ठाता, संचालक, कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्यासाठी एआयच्या वापराबाबत



विशेष कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यशाळेत टाटा कम्युनिकेशन्सचे वरिष्ठ एआय अधिकारी बळवंत गोरड यांनी मार्गदर्शन केले.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, विद्यापीठातील बैठका, अधिकृत टिपण्या, नियमावली, अधिनियम, अध्यादेश, तसेच विविध प्रशासकीय नोंदींचे विश्लेषण करण्यासाठी सध्या मोठ्या प्रमाणावर वेळ खर्च होतो. ही प्रक्रिया सुलभ करण्यासाठी एआयचा वापर केल्यास संबंधित कागदपत्रांचे पिन-पॉइंट विश्लेषण, संदर्भाधारित नोंदी, नियमांची पडताळणी आणि आवश्यक ते संदर्भ स्वयंचलितपणे उपलब्ध होऊ शकतील. ही प्रणाली पूर्णपणे शिवाजी विद्यापीठाच्या सर्व्हरवर कार्यरत राहणार असल्याने डेटा सुरक्षा, गोपनीयता आणि संस्थात्मक माहितीचे संरक्षण यांना प्राधान्य दिले जाणार आहे. सार्वजनिक एआय साधनांच्या तुलनेत ही व्यवस्था विद्यापीठाच्या गरजांनुसार सानुकूलित असेल. विशेषतः विद्यापीठाचे अंतर्गत नियम, अधिनियम आणि इतर अप्रकाशित माहितीही या प्रणालीमध्ये समाविष्ट करता येणार आहे.

प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव प्रमुख उपस्थित होते. यावेळी ॲकॅडमी ऑफ ॲकॅडेमिक ॲडमिनिस्ट्रेशनचे समन्वयक डॉ. केदार मारुलकर यांनी स्वागत, धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुहासिनी पाटील यांनी आभार मानले.

### शैक्षणिक संस्थांसाठी एआय उपयुक्त

बळवंत गोरड म्हणाले, शैक्षणिक संस्थांसाठी एआय प्रणाली अत्यंत उपयक्त असून, विद्यापीठातील प्रशासकीय कामकाज, कागदपत्रे प्रक्रिया, नियामक अनुपालन, संशोधन, परीक्षा, वित्त, मानव संसाधन आणि विद्यार्थी सेवा यासारख्या विविध विभागांमध्ये ती प्रभावी ठरू शकते.

19 JUL 2026 सिंधुदुर्ग समाचार
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठासाठी लवकरच स्वतंत्र एआय प्रणाली : कुलगुरू




कोल्हापूर/प्रतिनिधी : शिवाजी विद्यापीठाच्या प्रशासकीय कामकाजासाठी स्वतंत्र आणि सुरक्षित अशी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित प्रणाली लवकरच विकसित करण्याची महत्त्वपूर्ण घोषणा कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केली. प्रशासन, अध्यापन, संशोधन, नवोपक्रम आणि विद्यार्थी-सुविधा या पाच प्रमुख क्षेत्रांमध्ये ही प्रणाली उपयुक्त ठरणार असून, विद्यापीठाच्या कार्यपद्धतीला अधिक वेग, अचूकता आणि कार्यक्षमतेची दिशा मिळणार आहे.

"स्वतःच्या सुरक्षित सर्व्हरवर चालणारी ही प्रणाली विद्यापीठाच्या डिजिटल परिवर्तनातील एक निर्णायक पाऊल ठरेल — जिथे गती, अचूकता आणि गोपनीयता एकाच वेळी साध्य होईल," असे डॉ. कामत यांनी यावेळी नमूद केले.

शिवाजी विद्यापीठात आज विद्यापीठातील सर्व अधिकारी, अधिष्ठाता, संचालक, कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्यासाठी एआयच्या वापराबाबत विशेष कार्यशाळा झाली. त्यावेळी कुलगुरू डॉ. कामत बोलत होते. कार्यशाळेत टाटा कम्युनिकेशन्स लि.कंपनीचे वरिष्ठ एआय अधिकारी बळवंत गोरड यांनी मार्गदर्शन केले. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव आणि वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, विद्यापीठातील बैठका, अधिकृत टिपण्या, नियमावली, अधिनियम, अध्यादेश, तसेच विविध प्रशासकीय नोंदींचे विश्लेषण करण्यासाठी सध्या मोठ्या प्रमाणावर वेळ खर्च होतो. ही प्रक्रिया सुलभ करण्यासाठी एआयच्या वापर केल्यास संबंधित कागदपत्रांचे पिन-पॉईंट विश्लेषण, संदर्भाधारित नोंदी, नियमांची पडताळणी आणि आवश्यक ते संदर्भ स्वयंचलितपणे उपलब्ध होऊ शकतील. ही प्रणाली पूर्णपणे शिवाजी विद्यापीठाच्या सर्व्हरवर कार्यरत राहणार असल्याने डेटा सुरक्षा, गोपनीयता आणि संस्थात्मक माहितीचे संरक्षण यांना प्राधान्य दिले जाणार आहे. सार्वजनिक एआय साधनांच्या तुलनेत ही व्यवस्था विद्यापीठाच्या गरजांनुसार सानुकूलित असेल. विशेषतः विद्यापीठाचे अंतर्गत नियम, अधिनियम आणि इतर अप्रकाशित माहितीही या प्रणालीमध्ये समाविष्ट करता येणार आहे.

डॉ. कामत यांनी सांगितले की, या एआय प्रणालीचा उपयोग केवळ प्रशासनापुरता मर्यादित न राहता अध्यापन- अध्ययन प्रक्रियेतही होईल. विद्यार्थ्यांना त्यांचे अभ्यासक्रम, संदर्भग्रंथ, प्रकल्प सूचना आणि संशोधन साधने यांचा योग्य वेळी लाभ मिळू शकेल. याशिवाय फ्लिप्ड क्लासरूम, ओपन एज्युकेशन मॉडेल, लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम आणि संशोधनासाठीची स्वतंत्र डिजिटल लायब्ररी या संकल्पनांनाही यामुळे बळ मिळणार आहे. या उपक्रमामुळे कामाचा ताण कमी होऊन निर्णयप्रक्रिया जलद होईल, उत्पादकता वाढेल आणि प्रशासन अधिक पारदर्शक व परिणामकारक होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शिवाजी विद्यापीठाचे तांत्रिक पथक, आयटी सेल आणि संबंधित तज्ज्ञांच्या सहकार्याने विकसित होणारी ही प्रणाली विद्यापीठाच्या डिजिटल परिवर्तनातील महत्त्वाचे पाऊल ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### शैक्षणिक संस्थांसाठी एआय अत्यंत उपयुक्तः बळवंत गोरड

कार्यशाळेत बळवंत गोरड यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) उपयुक्ततेवर प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांनी आजच्या जगातील भारताची आर्थिक व तांत्रिक स्थिती स्पष्ट करताना शिक्षण आणि तंत्रज्ञानाच्या योग्य वापरातून देशाचा विकास कसा वेगाने होऊ शकतो, हे सविस्तर मांडले. विशेषतः शैक्षणिक संस्थांसाठी एआय प्रणाली अत्यंत उपयुक्त असून विद्यापीठांतील प्रशासकीय कामकाज, कागदपत्र प्रक्रिया, नियामक अनुपालन, संशोधन, परीक्षा, वित्त, मानव संसाधन आणि विद्यार्थीसेवा यांसारख्या विविध विभागांमध्ये तो प्रभावी ठरू शकतो. चॅटजीपीटीसारखी साधने ही एआयची केवळ उदाहरणे असून, संस्थेच्या स्वतःच्या डेटासह स्थानिक सर्व्हरवर एलएलएम आधारित प्रणाली उभारल्यास गोपनीयता जपली जाऊ शकते, असे स्पष्ट केले. सर्क्युलरचे सारांश, महत्त्वाचे मुद्दे, कृतीसूची तयार करणे, मीटिंगचे इतिवृत्त, पत्रलेखन, बजेट विश्लेषण, टेंडर ड्राफ्टिंग, नॅक, एनआयआरएफ इत्यादींसाठी एसएसआर निर्मिती व दस्तऐवजीकरण यांसारखी कामे अल्पावधीत कशी करता येतील, हे त्यांनी प्रात्यक्षिकाद्वारे दाखवून दिले.

यावेळी अ‍ॅकॅडमी ऑफ अ‍ॅकॅडेमिक अ‍ॅडमिनिस्ट्रेशनचे समन्वयक डॉ. केदार मारुलकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सुहासिनी पाटील यांनी आभार मानले.

19 JUL 2026
लोकमत

# शिवाजी विद्यापीठासाठी लवकरच स्वतंत्र 'एआय' प्रणाली : कुलगुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या प्रशासकीय कामकाजासाठी स्वतंत्र व सुरक्षित कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित प्रणाली लवकरच विकसित करण्यात येणार असल्याची घोषणा कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी शनिवारी केली. प्रशासन, अध्यापन, संशोधन, नवोपक्रम आणि विद्यार्थी सुविधा या पाच प्रमुख क्षेत्रांमध्ये या प्रणालीचा वापर होणार असून, विद्यापीठाच्या कार्यपद्धतीला अधिक वेग, अचूकता आणि कार्यक्षमता मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यापीठात अधिकारी, अधिष्ठाता, संचालक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'एआय'विषयक कार्यशाळेत ते बोलत होते. वरिष्ठ एआय अधिकारी बळवंत गोरड यांनी मार्गदर्शन केले. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव आणि डॉ. सुहासिनी पाटील उपस्थित होते. डॉ. कामत म्हणाले, विद्यापीठाच्या गरजेनुसार सानुकूलित प्रणाली असल्याने डेटा सुरक्षा व गोपनीयतेलाही प्राधान्य दिले जाईल. विद्यापीठाचे आयटी सेल व तज्ज्ञांच्या सहकार्याने ही प्रणाली विकसित केली जाणार आहे.

**५**
प्रमुख क्षेत्रांमध्ये एआय प्रणालीचा वापर होणार आहे.

गोरड यांनी एआयच्या उपयोगांचे प्रात्यक्षिक सादर केले. कागदपत्रांचे सारांश, बैठकीचे इतिवृत्त, पत्रलेखन, बजेट विश्लेषण, टेंडर मसुदे तसेच नॅक व एनआयआरएफसाठी आवश्यक दस्तावेज अल्पावधीत तयार करण्यासाठी एआय प्रभावी ठरू शकतो, असे त्यांनी सांगितले. डॉ. केदार मारुलकर यांनी प्रास्ताविक केले. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन, तर डॉ. सुहासिनी पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
19 JUL 2026 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समर्पित, नियोजनबद्ध प्रयत्नानेच यश

▪ कुलगुरू डॉ. राजनीश कामत

▪ शिवाजी विद्यापीठात विविध स्पर्धेतील यशस्वीतांचा गौरव

**। त. भा. प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांनी समर्पित व नियोजनबद्ध प्रयत्न केल्यास नक्की यश प्राप्त होते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५–२६मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघात सहभागी होऊन युवा महोत्सव, राष्ट्रीय कव्वाली, आविष्कार, अन्वेषण स्पर्धेमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे यश निश्चित उल्लेखनीय आहे. स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचा लौकिक उंचावला आहे.

विद्यार्थ्यांमधील कौशल्ये, सामर्थ्य, ऊर्जा आणि उत्साहाला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक प्रशिक्षणासह अन्य सुविधा वाढविण्याबाबत निश्चित विचार केला जाईल.




**कोल्हापूर : कार्यक्रमात बोलताना कुलगुरू डॉ. राजनीश कामत.**

सुरूवातीला लोककला वाद्यवृंदासह रूची पटेल (भरतनाट्यम्), सुमंत कुलकर्णी आणि सहकारी (पांडुरंगांचे अभंग), रवीराज भिसे (मिमिक्री), ऋषीकेश देशमाने, सुमंत कुलकर्णी आणि सहकारी (कव्वाली), वैष्णवी पोतदार (वक्तृत्व) यांनी सादरीकरण केले. युवा चित्रकार आदित्य घडशी यांनी कुलगुरू डॉ. कामत यांचे व्यंगचित्र काढले. मान्यवरांच्या हस्ते विविध स्पर्धांत पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

यावेळी शुभम गिरीगोसावी, संघ व्यवस्थापक डॉ. प्रमोद कसबे, वैजयंता पाटील, विद्यार्थी मार्गदर्शक शंतनू पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सावलीराम घाणे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

शिराळा येथील विश्वासराव नाईक महाविद्यालयाचे डॉ. प्रमोद पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कोल्हापूर जिल्हा समन्वयक डॉ. आर. एच. अतिग्रे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
19 JUL 2026 सिंधुदुर्ग समाचार शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समर्पित, नियोजनबद्ध प्रयत्नांमुळेच यशप्राप्ती : कुलगुरू डॉ.राजनीश कामत

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

विद्यार्थ्यांनी समर्पितपणे आणि नियोजनबद्ध प्रयत्न केल्यास त्यांना निश्चित यश प्राप्त होते, हे विद्यापीठाच्या संघाने विविध स्पर्धांतील घवघवीत यशातून सिद्ध केले आहे, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी आज येथे केले.




शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघात सहभागी होऊन युवा महोत्सव, राष्ट्रीय कव्वाली, आविष्कार, अन्वेषण स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये आज झाला. त्यावेळी अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. कामत बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ.ज्योती जाधव यांची विशेष उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, युवा महोत्सव, राष्ट्रीय कव्वाली, आविष्कार, अन्वेषण स्पर्धेमध्ये विद्यापीठ आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग उत्साहवर्धक आहे. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये मिळविलेले हे यश निश्चित उल्लेखनीय व वाखाण्याजोगे आहे. या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाचा लौकिक उंचावला आहे. विद्यार्थ्यांमधील कौशल्ये, सामर्थ्य, ऊर्जा आणि उत्साहाला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक प्रशिक्षणासह अन्य सुविधा वाढविण्याबाबत निश्चित विचार केला जाईल.

सुरूवातीला प्रातिनिधिक स्वरूपात निवडक कलागुणांचे सादरीकरण केले. यामध्ये लोककला वाद्यवृंदासह रूची पटेल (भरतनाटयम्), सुमंत कुलकर्णी आणि सहकारी (पांडुरंगांचे अभंग), रवीराज भिसे (मिमिक्री), ऋषीकेश देशमाने, सुमंत कुलकर्णी आणि सहकारी (कव्वाली), वैष्णवी पोतदार (वक्तृत्व) यांनी सादरीकरण केले. याप्रसंगी, युवा चित्रकार आदित्य घडशी यांनी उत्स्फूर्तपणे कुलगुरू डॉ.राजनीश कामत यांचे व्यंगचित्र काढले, ते त्यांना भेट देण्यात आले.

तत्पूर्वी, मान्यवरांच्या हस्ते विविध स्पर्धांत पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांना १६० पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यावेळी सहभागी विद्यार्थी शुभम गिरीगोसावी, संघ व्यवस्थापक डॉ. प्रमोद कसबे, वैजयंता पाटील, विद्यार्थी मार्गदर्शक शंतनू पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सावलीराम घाणे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. शिराळा येथील विश्वासराव नाईक महाविद्यालयाचे डॉ.प्रमोद पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कोल्हापूर जिल्हा समन्वयक डॉ.आर.एच. अतिग्रे यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी, संघ व्यवस्थापक, मार्गदर्शक आणि विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

19 JUL 2026
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील एम.एस्सी. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या स्वागतप्रसंगी दीपप्रज्वलन करताना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन. शेजारी प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे, प्रा. डॉ. केशव राजपुरे, प्रा. डॉ. संजय चव्हाण, डॉ. सुनील कुलकर्णी.

# समस्यांवर उपाय शोधण्यासाठी तरुण संशोधकांची साथ आवश्यक

## डॉ. जॅसमिन : भौतिकशास्त्र विभागात कार्यक्रम

कोल्हापूर, ता. १८ : पंचगंगा नदीचे प्रदूषण, घनकचरा व्यवस्थापन, जलप्रदूषण व ग्रामीण भागातील विविध सामाजिक समस्यांवर प्रभावी उपाय शोधण्यासाठी प्रशासनाला तरुण संशोधकांची साथ आवश्यक आहे, असे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात एम.एस्सी. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या स्वागतप्रसंगी त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयाचे डॉ. सुनील कुलकर्णी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विभागप्रमुख प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. कुलकर्णी यांनी मेरी क्युरी, डॉ. आशुतोष कोतवाल, कार्ल जानस्की, डॉ. अनिल काकोडकर यांच्या कार्याचा उल्लेख करत विद्यार्थ्यांनी जागतिक दर्जाचे संशोधक बनण्याचे ध्येय ठेवावे, असे आवाहन केले. दर आठवड्याला किमान एक संशोधन निबंध वाचून त्याच्या नोंदी ठेवण्याचा सल्लाही दिला. सोनकवडे यांनी विद्यार्थ्यांनी प्रशासकीय सेवांबरोबरच संशोधन व उद्योग क्षेत्रातील संधींचाही विचार करावा, असे सांगितले. प्रा. डॉ. केशव राजपुरे यांनी प्रास्ताविक केले. ऋतुजा निंबाळकर हिने शास्त्रीय नृत्य सादर केले. प्रमोद कोराणे यांनी आभार मानले.

1 9 JUL 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रदूषण, कचरा व्यवस्थापनासाठी संशोधकांची साथ हवी

## जि.प. सीईओ डॉ. जॅस्मिन : शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात एम. एस्सी. विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ

- समांजोपयोगी उपक्रमांमध्ये युवकांनी उत्स्फुर्त सहभाग घ्यावा
- विद्यार्थ्यांनी मेरी क्युरींचा आदर्श घेऊन जागतिक दर्जाचे संशोधक व्हावे - डॉ. सुनील कुलकर्णी
- रंकाळा प्रदूषण आणि जल व्यवस्थापनासाठी भौतिकशास्त्र विभागाचे विशेष प्रयत्न - प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात नुकताच एम. एस्सी. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभ दिमाखदार पद्धतीने पार पडला. प्रमुख पाहुणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जस्मिन, तसेच सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजचे डॉ. सुनील कुलकर्णी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे होते.



सत्कार समारोहनंतर, एम. एस्सी. द्वितीय वर्षाचा विद्यार्थी श्रेयश शिउडकर आणि प्रथम वर्षाची विद्यार्थिनी सुवर्णा सावंत यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. सुनील कुलकर्णी यांनी मेरी क्युरी यांचे प्रेरणादायी उदाहरण देत तत्कालीन समाजाचा विरोध पत्करून संशोधन केले आणि स्वतः शोधलेल्या मूलद्रव्याला अमेरिकेत आश्रय घेऊनही स्वतःच्या देशाच्या (पोलंडच्या) सन्मानार्थ 'पोलोनियम' असे नाव दिले. डॉ. आशुतोष कोतवाल यांनी रेडिओ टेलिस्कोपचा शोध लावणारे शास्त्रज्ञ कार्ल जानस्की यांची उदाहरणे देत विद्यार्थ्यांना जग बदलणारी उपकरणे आणि समीकरणे तयार करण्याचे आव्हान दिले. "पदव्युत्तर शिक्षण ही खऱ्या अर्थाने शिक्षणाची सुरुवात असते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी दर आठवड्याला किमान एक रिसर्च पेपर वाचून त्याच्या नोट्स काढाव्यात," असा मोलाचा सल्ला दिला. तसेच डॉ. अनिल काकोडकर यांच्या कार्याचा गौरव करताना, त्यांच्यामुळेच भारताला स्वस्त आणि सुरक्षित अणुऊर्जा मिळणे शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

प्रमुख पाहुण्या डॉ. जस्मिन यांनी विद्यार्थ्यांना अंधश्रद्धा आणि गैरसमजुतींपासून दूर राहून वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगण्याचा आग्रह धरला. पंचगंगा नदीचे प्रदूषण, घनकचरा व्यवस्थापन, आणि अयोग्य शेती पद्धतीमुळे उद्भवणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी प्रशासनाला विद्यापीठातील तुमच्यासारख्या तरुण संशोधकांच्या सहकार्याची नितांत गरज आहे," असे



आवाहन त्यांनी केले. यूपीएससी परीक्षेच्या तयारीबाबत मार्गदर्शन करताना अनेक पुस्तके वाचण्यापेक्षा एकाच पुस्तकाची उजळणी व स्वतःच्या विश्लेषणात्मक नोट्स काढणे यशासाठी महत्त्वाचे आहे. केवळ सरकारी नोकरीवर अवलंबून न राहता ग्रामीण भागातील समस्या ओळखून नाविन्यपूर्ण स्टार्टअप्स आणि उद्योजकता सुरू करण्याचा सल्लाही त्यांनी दिला. पुढे त्यांनी जिल्हा परिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन, महिला आरोग्य, पाणी प्रदूषण, आशा वर्कर यांसारख्या राबवण्यात येणाऱ्या शासकीय सामाजिक उपक्रमांमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या सर्वच विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले.

प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी मनोगतात डॉ. जस्मिन यांनी विद्यापीठाच्या कार्यक्रमाला आणि विद्यार्थ्यांना प्राधान्य दिल्याबद्दल त्यांचे विशेष आभार मानले.

निम करोली बाबा चॅरिटेबल ट्रस्ट आणि विभागाच्या माध्यमातून रंकाळा प्रदूषण आणि जल व्यवस्थापनासारख्या सामाजिक प्रश्नांवर सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी दिली. प्रास्ताविक भाषणामध्ये विभागाची यशोगाथा आणि वाटचाल उपस्थितांसमोर मांडली. भौतिकशास्त्र विभागाने पीआयएफसी सेंटरच्या माध्यमातून आतापर्यंत १५,००० पेक्षा जास्त सॅम्पल्स स्कॅन करून विद्यापीठाला लक्षणीय महसूल मिळवून दिला. विद्यापीठाच्या एकूण ६,५०० पब्लिकेशन्सपैकी ३,००० पब्लिकेशन्स भौतिकशास्त्र विभागाचे असून, त्यांना १ लाखापेक्षा जास्त सायटेशन्स मिळणे ही विद्यापीठासाठी अत्यंत अभिमानाची बाब असल्याचे सांगण्यात आले. या विभागाला विविध फंडिंग एजन्सीजकडून २० कोटी रुपयांचे महत्त्वपूर्ण प्रकल्प मिळाले असून, भाभा अणुसंशोधन केंद्राला तंत्रज्ञान हस्तांतरित करण्याचे मोठे कामही विभागाने केले. गॅस सेन्सर, सोलर सेल, पाणी शुद्धीकरण, आणि सुपर कॅपॅसिटर या अत्याधुनिक क्षेत्रांत येथे महत्त्वपूर्ण संशोधन सुरू आहे. याशिवाय, विभागाचे १५० पेक्षा जास्त विद्यार्थी दक्षिण कोरिया आणि इतर देशांत संशोधनासाठी गेले असून ते विभागाचे 'रिसर्च अम्बेसिडर्स' म्हणून काम करत आहेत असे प्रा. (डॉ.) केशव राजपुरे यांनी सांगितले. यानंतर एम.एस्सी. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी ऋतुजा निंबाळकर हिने शास्त्रीय नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. एम. एस्सी. द्वितीय वर्षाचा विद्यार्थी प्रमोद कोराणेने आभार मानले.

19 JUL 2026 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# योग्य पोषण, नैतिक मूल्ये खेळाडूंच्या यशाची सूत्रे : अवंती दामले

कोल्हापूर, ता. १८ : केवळ शारीरिक तंदुरुस्ती नव्हे, तर मानसिक सक्षमता, योग्य पोषण आणि नैतिक मूल्ये हीही खेळाडूंच्या यशाची महत्त्वाची सूत्रे आहेत. त्यामुळे खेळाडूंनी मानसशास्त्र, संतुलित आहार आणि डोपिंगपासून दूर राहण्याबाबत जागरूक राहणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन क्रीडा आहारतज्ज्ञ अवंती दामले यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात 'क्रीडा मानसशास्त्र, क्रीडा पोषण आणि डोपिंग' या विषयावर विशेष चर्चासत्रात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. राजनीश कामत होते, तर प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

दामले म्हणाल्या, 'देशाला जागतिक क्रीडा क्षेत्रात अधिक यश मिळवून देण्यासाठी खेळाडूंनी स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडविणे आवश्यक आहे. खेळाडूंचा आहार हा त्यांच्या खेळाला पूरक असला पाहिजे. डाळी, कडधान्ये, भरडधान्ये, दूध, मध, गूळ आणि बटाटा यांसारख्या पदार्थांचा आहारात समावेश करावा. पुरेशी झोप, नियमित सराव, योग्य प्रमाणात पाणी पिणे आणि स्मार्टफोनचा मर्यादित वापर याकडेही त्यांनी लक्ष वेधले.'



कोल्हापूरः शिवाजी विद्यापीठात चर्चासत्रात बोलताना अवंती दामले.

डॉ. यशवंत वेलणकर यांनी खेळाडूंच्या मानसिक व भावनिक तयारीचे महत्त्व अधोरेखित केले. अपयश स्वीकारण्याची क्षमता, एकाग्रता, स्वयंप्रेरणा आणि मानसिक स्थैर्य ही यशस्वी खेळाडूंची ओळख असल्याचे त्यांनी नमूद केले. डोपिंगचे परिणाम दीर्घकालीन आणि गंभीर असल्याने त्यापासून दूर राहण्याचे आवाहनही त्यांनी केले.

व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्थ शिंदे म्हणाले, 'खेळाचे मानसशास्त्र खेळाडूंना त्यांच्या क्षमतेवर विश्वास ठेवण्यास आणि आत्मविश्वासाने खेळण्यास मदत करते. खेळात सातत्य असणे आवश्यक असल्याचे सांगितले.'

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, 'योग्य पोषण, मानसिक स्थैर्य आणि नैतिकतेच्या आधारावरच उत्कृष्ट खेळाडू घडतात. गैरमार्गाने मिळविलेले यश कधीही टिकत नाही.' अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. किरण पाटील यांनी आभार मानले. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी विद्या शिरस आदी उपस्थित होते.

19 JUL 2026
सिंधुदुर्ग समाचार

# क्रीडा मानसशास्त्र, पोषण आणि डोपिंग याविषयी शिवाजी विद्यापीठात उद्या विशेष चर्चासत्र

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागामार्फत उद्या, शनिवारी (दि. १८) 'क्रीडा मानसशास्त्र, क्रीडा पोषण आणि डोपिंग' या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. हे व्याख्यान दुपारी २ वाजता राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात होईल. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत अध्यक्षस्थानी असतील, तर, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती असेल.

कार्यक्रमात सुप्रसिद्ध स्पोर्ट्स न्यूट्रिशनिस्ट व वेलनेस कन्सल्टंट अवंती दामले या खेळाडूंसाठी संतुलित आहार, स्पोर्ट्स न्यूट्रिशन आणि कार्यक्षमतेत पोषणाचे महत्त्व व डोपिंग याविषयी मार्गदर्शन करतील. तसेच, प्रसिद्धफिजिओथेरपिस्ट व सल्लागार डॉ. यशवंत वेलणकर हे क्रीडा मानसशास्त्र, मानसिक तयारी, माइंडफुलनेस, तणाव व्यवस्थापन आणि उत्कृष्ट कामगिरीसाठी आवश्यक मानसिक कौशल्यांबाबत मार्गदर्शन करतील. कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा उपसंचालक सुहास पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्थ शिंदे, जिल्हा क्रीडा अधिकारी विद्या सिरस यांची प्रमुख उपस्थिती असेल.

चर्चासत्राला कोल्हापूर, सांगली, सातारा तसेच अन्य जिल्ह्यांतील वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थी, खेळाडू, शारीरिक शिक्षण संचालक, शारीरिक शिक्षण अधिव्याख्याते, प्रशिक्षक, स्पोर्ट्स क्लब्स, विविध क्रीडा संघटनांचे पदाधिकारी, पालक आणि क्रीडाप्रेमी नागरिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठ क्रीडा संचालक डॉ शरद बनसोडे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JUL 2026 क्रांतीसिंह

# सामाजिक नैतिकता म्हणजे डॉ. एन. डी. पाटील

कोल्हापूर(प्रतिनिधी):- डॉ. एन.डी. पाटील म्हणजे राजकारणातील नैतिकता आणि सामाजिक न्यायाचा ध्यास होते. त्यांच्या प्रत्येक चळवळीला, आंदोलनाला त्यांच्या उच्च नैतिकतेचे अधिष्ठान लाभलेले होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकीहाळ यांनी येथे केले.

ज्येष्ठ नेते डॉ. एन. डी. पाटील यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात डॉ. एन.डी. पाटील आणि सामाजिक चळवळी या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. बेडकीहाळ यांनी डॉ. पाटील यांच्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक चळवळींचा सर्वांगीण आढावा घेतला. विद्यापीठाच्या डॉ. एन.डी. पाटील लोकचळवळ अध्यासनाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते, तर डॉ. सरोज (माई) पाटील प्रमुख उपस्थित होत्या.

यावेळी बहुजन व शोषितकेंद्री राजकारण, श्रमिककेंद्री अर्थकारण आणि सामाजिक न्यायकेंद्री समाजकारण हा डॉ. पाटील यांच्या संपूर्ण राजकीय आणि सामाजिक चळवळीचा गाभा असल्याचे सांगून श्री. बेडकीहाळ म्हणाले, डॉ. एन. डी. पाटील यांचे व्यक्तिमत्त्व विचार आणि आचार यांचा दुर्मीळ संगम होते. राजकारणातील नैतिकता आणि नैतिकतेचे राजकारण यांचे अद्वैत त्यांनी आयुष्यभर जपले. *सार्वजनिक जीवनात वैयक्तिक स्वार्थाला कधीही स्थान न देता पारदर्शक, मूल्यनिष्ठ आणि संघर्षशील* नेतृत्व त्यांनी उभे केले. शेतकरी, शेतमजूर, कामगार, धरणग्रस्त, वंचित आणि बहुजन समाजाच्या प्रश्नांना त्यांनी आयुष्यभर प्राधान्य दिले. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, दुष्काळग्रस्तांचे आंदोलन, शेतमालाला योग्य भाव, रोजगार हमी, नामांतर चळवळ, सामाजिक न्याय आणि शिक्षणाचा हक्क अशा विविध प्रश्नांवर त्यांनी सातत्याने संघर्ष उभारला.

डॉ. पाटील यांच्या आंदोलनांची वैशिष्ट्ये स्पष्ट करताना बेडकीहाळ यांनी सांगितले की, प्रत्येक आंदोलनामागे सखोल अभ्यास, प्रश्नांची नैतिकता, योग्य वेळ आणि शांततामय संघर्षाची भूमिका असे चार महत्त्वाचे आधारस्तंभ असत. आंदोलन करतानाही संवादाचे दरवाजे कायम खुले



ठेवण्याची त्यांची भूमिका होती. गांधीवादी अहिंसा आणि समाजवादी विचार यांचा प्रभाव त्यांच्या कार्यपद्धतीत स्पष्टपणे दिसून येत होता.

शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचा उल्लेख करताना बेडकीहाळ म्हणाले, शिक्षण हा प्रत्येकाचा मूलभूत हक्क आहे, आर्थिक परिस्थिती त्यासाठी अडथळा ठरू नये, ही त्यांची ठाम भूमिका होती. ग्रामीण आणि शहरी विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव होऊ नये तसेच गुणवत्तापूर्ण आणि न्याय्य शिक्षणव्यवस्था उभी राहावी, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

अध्यक्षीय समारोपात कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी डॉ. एन. डी. पाटील यांचे व्यक्तिमत्त्व हे सखोल अध्ययन, चिंतन आणि मूल्याधिष्ठित कृतीतून घडल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रश्नावर भूमिका घेण्यापूर्वी त्याचा सर्वांगीण अभ्यास करण्याची वृत्ती अंगीकारावी, हाच डॉ. पाटील यांच्या जीवनातून घेण्यासारखा मोठा संदेश असल्याचे त्यांनी नमूद केले. महापुरुषांचे अंधानुकरण न करता त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन स्वतःचे व्यक्तिमत्त्व अधिक सक्षम घडवावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच,डॉ. सरोज(माई) पाटील यांनी डॉ. एन. डी. पाटील यांच्या सहजीवनातील आठवणी पुस्तक स्वरूपात जतन करून पुढील पिढीसमोर आणाव्यात, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी डॉ. सरोज पाटील यांनीही डॉ. एन.डी. पाटील यांच्यासोबतच्या आपल्या सहजीवनातील आठवणींना उजाळा दिला. एन.डी. पाटील यांना लोक वादळ समजत आणि या वादळासमवेत मी संसार केला, याबद्दल माझे कौतुक करतात. तथापि, एन. डी. सर हे वादळ नव्हेत, तर समाजाच्या वेदनांवर हळुवार फुंकर घालणारी सुखद वाऱ्याची झुळूक होते. त्यांनी आयुष्यभर जोपासलेल्या उच्च नीतिमानतेचा आम्हा सर्वच कुटुंबियांना नेहमीच अभिमान राहिला, असे त्यांनी सांगितले.

अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. कार्यक्रमाला डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. टी.एस. पाटील, डॉ. भारती पाटील, डॉ. अवनीश पाटील, डॉ. प्रभंजन माने, डॉ. कृष्णा पाटील, डॉ. अक्षय सरवदे, दिनकर झिंबरे, एम.बी. शेख, अभिषेक मिठारी यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**डॉ.एन.डी.पाटील यांच्यावर पोवाडा**-कार्यक्रमाच्या सुरवातीला डॉ. एन.डी. पाटील यांच्या जीवनकार्यावर प्रकाशझोत टाकणारा अतिशय स्फूर्तीदायक पोवाडा शाहीर रंगराव पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सादर केला. त्यांच्या या सादरीकरणाने उपस्थितांची मोठी वाहवा मिळविली.